# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेसनोट क्रमांक २७८/२०२४** **दिनांक:- २७/०७/२०२४.**

**"गॅस बिल अपडेट करण्याचे नावाने बनावट लिंक पाठवुन तक्रारदार यांची फसवणुक केलेली १,२५,०००/- रक्कम परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश"**

तक्रारदार नामे श्री.वाणी यांना दिनांक २३/०५/२०२४ रोजी मोबाईलवर गॅस बिल भरण्याबाबत/ अपडेट करण्यासाठी लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांचे मोबाईलवर प्राप्त लिंकमध्ये नमुद केल्याप्रमाणे माहिती भरली असता त्यांचे बँक खात्यातुन १,२५,००/- कपात झाल्याचा मॅसेज त्यांना प्राप्त झाला. तक्रारदार यांची वरीलप्रमाणे फसवणुक झाली तेव्हा ते पुणे येथे कामानिमित्त गेले होते. तात्काळ तक्रार नोंदविण्याकरीता तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाणे मि.भा.व.वि येथील मेल-आयडीवर तक्रारीबाबत माहिती दिली. त्या अनुषंगाने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारदार यांचे तक्रारीची तात्काळ नोंद घेण्यात आली.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्र. १२०७/२०२४ दिनांक २३/०५/२०२४.)**

वरील प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांचे व्यवहारचे अवलोकन केले असता फसवणुक झालेली रक्कम ऑनलाईन मर्चंट PayU च्या माध्यमातुन पुढे वळती झाल्याचे दिसुन आले.त्या अनुषंगाने PayU यांचेसोबत तात्काळ पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम गोठवुन मुळ खात्यात परत करण्याबाबत पत्रव्यवहार करुन कळविण्यात आले.

**सदर पत्रव्यवहाराचे अनुषंगाने तक्रारदार यांची फसवणुक झालेली पुर्ण रक्कम १,२५,०००/- त्यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेली आहे.**

<u>फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...</u>

- **इलेक्ट्रिसिटी/गॅस बिल भरण्याबाबत फोन अगर व्हॉटसअपवर अनोळखी लिंक प्राप्त झाल्यास पडताळणी झाल्याशिवाय कारवाई करु नये.**
- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती/ आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० तसेच www.cybercrime.gov.in वर संपर्क करुन आपली तक्रार नोंदवावी.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/प्रसाद शेनोळकर, पोअं/२२००३ कुणाल सावळे, पोअं/१७०५३ शुभम कांबळे, मसुब/राजेश भरकडे यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- **www.cybercrime.gov.in**

**---------0000---------**